290

जा. क्र./कृषि.यांत्रि./उ.शे.स.शे./२०१८-१९/गुनि-५/     /२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
दिनांक : 03 /०५/२०१८

**प्रति,**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ..................(सर्व)**

**विषय : सन २०१८-१९ उन्नत शेती - समृध्द शेतकरी मोहीम**
**कृषि यांत्रिकीकरणासाठी अनुदानाचा लाभ घेणेकरीता इच्छुक शेतक-यांचे अर्ज मागविणेकरीता जाहिरात प्रसिध्द करणेबाबत...**

**संदर्भ :** शासन निर्णय क्र.०४१८/प्र.क्र.१५५/१४ -अे, दि. २७/०४/२०१८

संदर्भिय शासन निर्णय दि. २७/०४/२०१८ अन्वये सन २०१८-१९ 'उन्नत शेती-समृध्द शेतकरी' ही मोहीम राबविण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत. सुलभ संदर्भासाठी सदरहु शासन निर्णयाची प्रत सोबत सहपत्रीत केली आहे.

**कृषि यांत्रिकीकरणांतर्गत पुढील औजारे/यंत्रांचा पुरवठा अनुदानावर करण्यात येणार आहे.**

ट्रॅक्टर/लहान ट्रॅक्टर, पॉवर टिलर, रोटाव्हेटर, मोगडा (कल्टीव्हेटर), सर्व प्रकारचे प्लांटर (खत व बी टोकन यंत्र), मळणी यंत्र, भात लावणी यंत्र (ट्रान्सप्लांटर), पॉवर विडर, रिपर व रिपर कम बाईंडर, भात मळणी यंत्र, मिनी भात मिल, दाल मिल व पुरक यंत्र संच (डी-स्टोनर, पॉलीशिंग, ग्रेडींग, पॅकींग इ.), कापूस प-हाटी श्रेडर, ऊस पाचट कुट्टी /श्रेडर/ मल्चर, ट्रॅक्टर चलीत फवारणी यंत्र (बूम स्प्रेअर), मिस्ट ब्लोअर, सबसॉईलर, ब्रश कटर.

संदर्भिय शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४.५.३ अन्वये सर्व प्रचलीत योजनांखालील यांत्रिकीकरणाच्या निधीतून ट्रॅक्टर व उपरोक्त यंत्र /औजारे उपलब्ध करुन देण्यात येत असल्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांनी प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये जाहीरात प्रसिध्द करावी व इच्छुक लाभार्थ्याचे अर्ज मागवावेत असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांनी तात्काळ प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करावी व इच्छुक लाभार्थ्यांचे अर्ज मागवावेत. इच्छुक शेतक-यांना अर्ज करण्याकरीता २० दिवसांचा अवधी द्यावा. प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी जाहिरातीचा नमुना सोबत सहपत्रीत केला आहे.

कृषि यांत्रिकीकरणाकरीता अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांना अर्ज करण्याकरीता सर्व प्रचलीत योजनांतर्गत ट्रॅक्टर/यंत्र/औजारांसाठी अर्जाचा नमुना तसेच कृषि यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत कृषि औजारे बॅन्क स्थापनेकरीता अर्जाचा नमुना सोबत सहपत्रीत केला आहे. जाहिरातीचा नमुना व अर्जाचा नमुना कृषि विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

लाभार्थीचे अर्ज कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांनी स्विकारावेत व तालुका कृषि अधिकारी यांनी सदर अर्ज विनाविलंब जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे लाभार्थी निवडीसाठी सादर करावेत.

**सोबत - वरीलप्रमाणे.**

**(एम. एस. घोलप)**
**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत - माहीतीस्तव सविनय सादर -**

१. **कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**
२. **विभागीय कृषि सहसंचालक,.....(सर्व)** - यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**कृषि विभाग**

# जाहिरात

## उन्नत शेती - समृध्द शेतकरी मोहीम : २०१८-१९

कृषि विभागाच्या प्रचलीत योजनांतर्गत यांत्रिकीकरणाकरीता इच्छुक शेतक-यांचे अर्ज मागविणेत येत आहेत.

### १. अनुदान पात्र यंत्र/औजारांची यादी :

| अ. न. | कृषि औजाराचा प्रकार | अ.जा., अ.ज., अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी व महिला लाभार्थींसाठी | | इतर लाभार्थींसाठी | |
|---|---|---|---|---|---|
| | | कमाल अनुदान मर्यादा प्रती यंत्र/औजारे | अनुदानाची टक्केवारी | कमाल अनुदान मर्यादा प्रती यंत्र/औजारे | अनुदानाची टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **अ.** | **ट्रॅक्टर** | | | | |
| १ | ट्रॅक्टर (०८-२० पी.टी.ओ. एच.पी.) | रु. १.०० लाख | ३५ टक्के | रु. ०.७५ लाख | २५ टक्के |
| २ | ट्रॅक्टर (२०-७० पी.टी.ओ. एच.पी.) | रु. १.२५ लाख | ३५ टक्के | रु. १.०० लाख | २५ टक्के |
| **ब.** | **स्वयंचलीत यंत्रे** | | | | |
| १ | पॉवर टिलर | रु. ०.५० ते ०.७५लाख | ५० टक्के | रु.०.४० ते ०.६०लाख | ४० टक्के |
| २ | स्वयंचलीत पॅडी ट्रान्सप्लांन्टर (४ रांगा/ओळी) | रु. ०.९४ लाख | ५० टक्के | रु. ०.७५ लाख | ४० टक्के |
| ३ | स्वयंचलीत पॅडी ट्रान्सप्लांन्टर ४- १६ रांगा व त्यापेक्षा जास्त | रु. २.०० लाख | ४० टक्के | रु. २.०० लाख | ४० टक्के |
| ४ | स्वयंचलीत यंत्रे – रिपर कम बाईंडर | रु. १.२५ लाख | ५० टक्के | रु. १.०० लाख | ४० टक्के |
| ५ | रिपर, न्युमॅटीक/ इतर प्लॉन्टर | रु. ०.६३ लाख | ५० टक्के | रु. ०.५० लाख | ४० टक्के |
| **क** | **ट्रॅक्टर / पॉवर टिलर चलीत यंत्रे/औजारे** | | | | |
| १ | कल्टीव्हेटर | रु. ०.१५ ते ०.४४लाख | ५० टक्के | रु.०.१२ ते ०.३५लाख | ४० टक्के |
| २ | रोटाव्हेटर/सब सॉइलर/रोटो कल्टीव्हेटर | रु. ०.३५ ते ०.६३लाख | ५० टक्के | रु.०.२८ ते ०.५०लाख | ४० टक्के |
| ३ | सर्व प्रकारचे प्लॉन्टर (खत व बी टोकण यंत्र) /मल्चर (ऊसाकरीता) | रु. ०.१५ ते ०.६३लाख | ५० टक्के | रु.०.१२ ते ०.५०लाख | ४० टक्के |
| ४ | पॉवर वीडर | रु. ०.१५ ते ०.६३लाख | ५० टक्के | रु.०.१२ ते ०.५०लाख | ४० टक्के |

| अ.न. | कृषि औजाराचा प्रकार | अ.जा., अ.ज., अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी व महिला लाभार्थीसाठी | | इतर लाभार्थींसाठी | |
|---|---|---|---|---|---|
| | | कमाल अनुदान मर्यादा प्रती यंत्र/औजारे | अनुदानाची टक्केवारी | कमाल अनुदान मर्यादा प्रती यंत्र/औजारे | अनुदानाची टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ५ | शुगर केन थ्रेश कटर/ स्ट्रॉ रिपर | रु. ०.१५ ते ०.६३ लाख | ५० टक्के | रु.०.१२ ते ०.५०लाख | ४० टक्के |
| ६ | सर्व प्रकारचे थ्रेशर व रिपर | रु. ०.२० ते ०.६३ लाख | ५० टक्के | रु.०.१६ ते ०.५०लाख | ४० टक्के |
| ७ | ट्रॅक्टर माऊंटेड/ऑपरेटेड स्प्रेयर ( २० बी. एच. पी.पेक्षा कमी ते ३५ बी. एच. पी.पेक्षा जास्त) | रु. ०.१० ते ०.६३ लाख | ५० टक्के | रु.०.०८ ते ०.५०लाख | ४० टक्के |
| ८ | मिनी राईस मील/मिनी दाल मील/ पॅकिंग मशीन | रु. १.५० लाख | ६० टक्के | रु.१.२५ लाख | ५० टक्के |
| ९ | राईस मील व दाल मीलसाठी सर्व प्रकारचे पॉलीशर/क्लीनर कम ग्रेडर /ग्रॅडीयंट सेपरेटर/ स्पेसीफिक ग्रॅव्हीटी सेपरेटर | रु. ०.४४ लाख | ५० टक्के | रु. ०.३५ लाख | ४० टक्के |
| १० | कापुस प-हाटी श्रेडर | रु. ०.२० ते ०.६३ लाख | ५० टक्के | रु.०.१६ ते ०.५०लाख | ४० टक्के |
| ११ | ब्रश कटर | रु. ०.२० ते ०.२५ लाख | ५० टक्के | रु.०.१६ ते ०.२०लाख | ४० टक्के |

**प्रमुख अटी / शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

१. जे शेतकरी ट्रॅक्टर चलीत यंत्र /औजारांकरीता अर्ज करतील त्यांनी अर्जासोबत त्यांच्याकडे किंवा कुटूंबातील अन्य सदस्यांच्या नावे ट्रॅक्टर असल्याबाबतचा पुरावा (आर.सी.बुक) सादर करणे अनिवार्य राहील.
२. प्रत्येक औजारासाठी शेतक-याने विहीत नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. तथापी, ज्या औजारास जास्तीत जास्त अनुदान देय आहे, त्या एकाच यंत्र/औजारास अनुदान दिले जाईल.
३. लाभार्थीची निवड तालुका हा घटक मानुन जिल्हास्तरावर सोडत पध्दतीने करण्यात येईल.
४. शेतक-यांनी विहीत नमुन्यातील अर्ज दि.    मे, २०१८ पर्यंत कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांचेकडे जमा करावेत.
५. अर्जाचा विहीत नमुना तालुका कृषि अधिकारी कार्यालय व कृषि विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
६. कृषि विभागाच्या विविध योजनांकरिता जिल्ह्यास प्राप्त होणा-या निधीच्या लक्षांकाच्या मर्यादेत लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.
७. अनुदानाची रक्कम लाभार्थीच्या आधार संलग्न बॅक खात्यामध्ये थेट जमा केली जाईल.

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा अथवा कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in संकेतस्थळावरून याबाबत माहिती घ्यावी.**

**पदनाम व स्वाक्षरी**

महाराष्ट्र शासन (कृषि विभाग)

**उन्नत शेती -समृध्द शेतकरी मोहीम २०१८- कृषि यांत्रिकीकरणाचा लाभ घेणेसाठी अर्ज**
**(शेतक-यांनी या अर्जासोबत कोणतेही कागदपत्र सादर करु नयेत.)**

दि. / /२०१८

प्रति,

तालुका कृषि अधिकारी,

------------------------

**विषय - उन्नत शेती - समृध्द शेतकरी मोहीम २०१८ अंतर्गत कृषि विभागाच्या प्रचलित योजनेतुन कृषि यांत्रिकीकरणाकरीता अर्थसहाय्य मिळणेबाबत अर्ज...**

**महोदय,**

मी उपरोक्त नमूद केलेल्या उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहीमेअंतर्गत **कृषि यांत्रिकीकरण** योजनेचा लाभ घेऊइच्छितो/ईच्छिते, त्यासाठी आवश्यक माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

**अ. कृषि औजारांची माहिती – (खालील यादीतील केवळ एक औजार/यंत्र निवडावे.)**

| |
|---|
| ट्रॅक्टर (०८-२० पी.टी.ओ. एच.पी.), ट्रॅक्टर (२०-७० पी.टी.ओ. एच.पी.), पॉवर टिलर, रोटाव्हेटर, मोगडा (कल्टीव्हेटर), सर्व प्रकारचे प्लांटर (खत व बी टोकन यंत्र), मळणी यंत्र, भात लावणी यंत्र (ट्रान्सप्लांटर), पॉवर विडर, रिपर व रिपर कम बाईडर, भात मळणी यंत्र, मिनी भात मिल, दाल मिल व पुरक यंत्र संच (डी-स्टोनर, पॉलिशिंग, ग्रेडींग, पॅकींग इ.), कापूस प-हाटी श्रेडर, ऊस पाचट कुट्टी /श्रेडर/ मल्चर, ट्रॅक्टर चलीत फवारणी यंत्र (बूम स्प्रेअर), मिस्ट ब्लोअर, सबसॉईलर, ब्रश कटर. |

१. **मागणी असलेल्या औजाराचे नाव :** ........................................
२. **जुना ट्रॅक्टर आहे काय?** होय/नाही .......
३. **असल्यास ट्रॅक्टर क्रमांक :**

**ब. व्यक्तीगत माहिती**

१. **अर्जदाराचे नाव :**

| आडनाव | नाव | वडील/पतीचे नाव |
|---|---|---|
| | | |

२. **रहिवासाचा पत्ता :**

| ठिकाण | | | | गाव | |
|---|---|---|---|---|---|
| तालुका | | जिल्हा | | पिन | |

३. **अर्जदार स्त्री/पुरष (आवश्यक ठिकाणी √ खूण करावी):**

| स्त्री | | पुरुष | |
|---|---|---|---|

४. **अर्जदाराचा वर्ग (आवश्यक ठिकाणी √ खूण करावी)**

| खुला | | अ.जा | | अ.ज. | | अल्प/अत्यल्प भूधारक (२ हे.पेक्षा कमी) | | बहुभूधारक (२ हे.पेक्षा जास्त) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

५. **अर्जदाराच्या संपर्काचा तपशील:**

| भ्रमणध्वनी | | | | | | | | | | | दूरध्वनी | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**६.अर्जदाराचा आधार कार्डशी संलग्न बॅक खात्याचा तपशील:**

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. | आधार कार्ड क्रमांक | | | | | | | | | | | | |
| ब. | खाते क्रमांक | | | | | | | | | | | | |
| क. | शाखा व पत्ता | | | | | | | | | | | | |
| ड. | बँकेचे नांव | | | | | | | | | | | | |
| इ. | आयएफसी कोड | | | | | | | | | | | | |

**क. मी याद्वारे घोषित करतो/करते की, खालील नमुद अटींची मला जाणिव असुन त्या मला मान्य आहेत.**

१. जे शेतकरी ट्रॅक्टर चलीत यंत्र /औजारांकरीता अर्ज करतील त्यांनी अर्जासोबत त्यांच्याकडे ट्रॅक्टर असल्याबाबतचा पुरावा (आर.सी.बुक) सादर करणे अनिवार्य राहील.

२. प्रत्येक औजारासाठी वेगळा अर्ज करणे आवश्यक आहे.

३. ज्या औजाराचा लाभ घ्यावयाचा त्या औजाराचा मी किंवा माझ्या कुटुंबीयांनी यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून लाभ घेतलेला नाही.

४. एका लाभार्थ्यास एका आर्थिक वर्षात एकाच औजाराचा लाभ घेता येईल याची मला जाणीव आहे.

५. कुटुंबातील (कुटुंब म्हणजे आई-वडील व त्यांच्यावर अवलंबुन असलेली अविवाहीत अपत्य) एकापेक्षा जास्त सदस्यांची सोडतीमध्ये नावे आल्यास, त्यातील कोणत्याही एका सदस्यास ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजाराच्या खरेदीसाठी अनुदान देय राहील व अन्य सदस्यांची नावे त्यांच्याकडून लेखी संमतीपत्र घेवुन वगळण्यात येतील.

६. सदर अर्जाद्वारे लॉटरी पध्दतीने तयार होणारी निवड यादी दिनांक ३१ मार्च २०१९ नंतर रद्द होईल.

७. एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास मागणी केलेल्या औजारांपैकी ज्या औजारास जास्तीत जास्त अनुदानाची रक्कम आहे त्यासाठी ही निवड होईल व इतर औजारासाठी मी केलेला अर्ज आपोआप रद्द होईल.

८. माझी लाभार्थी म्हणुन निवड झाल्यानंतर मला विहित कालावधीत आवश्यक कागदपत्रांच्या (७/१२, ८-अ दाखला, आधार कार्ड /ओळखपत्र, अ.जा./अ.ज. प्रवर्गातील असल्यास जात प्रमाणपत्र, खरेदी करावयाच्या यंत्र/औजाराचे परीक्षण केल्याचा पुरावा व औजारांचे दरपत्रक) स्वयंसाक्षांकित प्रती सादर करावयाच्या आहेत अन्यथा मला पुर्वसंमती दिली जाणार नाही.

९. मला औजारे खरेदीकरीता पुर्वसंमती मिळाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत औजारे/यंत्राची खुल्या बाजारातून खरेदी करुन एक महिन्याच्या आत देयक व प्रमाणपत्र/तपासणी अहवालासह प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा मला अनुदान प्रदान केले जाणार नाही.

१०. मला औजारे खरेदीकरीता पूर्वसंमती मिळाल्यानंतर औजारे/यंत्रांची खुल्या बाजारातून खरेदी करताना स्वतःच्या बँक खात्यातून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने (आर.टी.जी.एस./एन.इ.फ.टी./आय.एम.पी.एस.)/ धनादेश/ धनाकर्षाद्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक आहे.

११. औजाराची खरेदी किंमतीची पुर्ण रक्कम भरुन खुल्या बाजारातून औजारे खरेदी करण्यास मी तयार आहे.

१२. अनुदानाची रक्कम माझे आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा केली जाईल. त्याकरीता मी माझे उपरोक्त नमुद बँक खाते आधार क्रमांकाशी जोडलेले आहे/जोडणार आहे.

१३. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी ज्या यंत्र/औजाराचे रीतसर परिक्षण (Testing) करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार(standards)/तांत्रिक निकषांनुसार असल्याचे प्रमाणीत केले असेल, त्याच यंत्र/औजाराची खुल्या बाजारातुन मी खरेदी करावयाची असुन अनुदानाकरीता देयक सादर करताना त्याचे प्रमाणपत्र/तपासणी अहवाल (छायांकित प्रत) सादर करणे मला बंधनकारक आहे.

१४. मी औजार/उपकरण खुल्या बाजारातून माझ्या पसंतीने खरेदी करणार असल्याने औजार/उपकरणाच्या गुणवत्तेची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

१५. मी यंत्र/औजारांची खरेदी करतेवेळी सदर यंत्र/औजाराचे वॉरंटी, यंत्र/औजार परीक्षण अहवाल स्वतःच्या हित रक्षणासाठी विक्रेत्याकडून प्राप्त करुन घेईल.

१६. उपरोक्त सर्व माहीती अचुक व बरोबर असुन त्यामध्ये कोणतीही तफावत आढळल्यास त्यास मी जबाबदार राहीन.

**ठिकाण:** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**दिनांक:** **(संपुर्ण नाव)**

## अर्जाचा नमुना - 'औजारे बॅन्क स्थापनेसाठी अनुदान मिळणेकरीता अर्ज'

### कृषि उन्नती योजनेंतर्गत कृषि यांत्रीकीकरण उपअभियान सन २०१८-१९
### घटक क्र. ४ : 'कृषि औजारे बॅन्क स्थापनेसाठी अर्थसहाय्य'

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी,**

..............................

**विषय :- कृषि उन्नती योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान सन २०१८-१९ मधील घटक क्र.-४ 'कृषि औजारे बॅन्क स्थापनेसाठी अर्थसहाय्य' योजनेचा लाभ मिळणेबाबत...**

महोदय,

मी उपरोक्त विषयामध्ये नमुद केलेप्रमाणे आपलेकडील कृषि उन्नती योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान सन २०१८-१९ अंतर्गत घटक क्र.४: **'कृषि औजारे बॅन्क स्थापनेसाठी अर्थसहाय्य'** या घटकाचा लाभ घेवु इच्छित आहे. सदर योजनेच्या अनुदानातून शासनाने निश्चित केलेल्या नियमानुसार अर्जामध्ये नमुद केलेल्या औजार/यंत्रे/ उपकरणाच्या खरेदीकरीता पुर्वसंमती मिळावी व अनुदान उपलब्ध होवून मिळावे, ही विनंती.

**१. अर्जदाराची माहिती :**

| | |
|---|---|
| **१. अर्जदाराचे/संस्थेचे नांवः** | |
| **२. अर्जदाराचा प्रकार** (लागु असलेल्या ठिकाणी √ खूण करावी.) | शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतक-यांचे स्वयंसहाय्यता गट/ शेतकरी उत्पादक गट/कृषि विज्ञान केंद्रे/ ................................... (इतर) |

**२. अर्जदाराचा/संस्थेचा पत्ता :**

| | | | |
|---|---|---|---|
| **ठिकाण** | | **गांव** | |
| **तालुका** | | **जिल्हा** | |
| **पिन** | | **फोन नं./मो.नं.** | |

**३. संस्थेचा तपशील/ अथवा ज्या व्यक्तीच्या बॅन्क खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधीकृत केले आहे अशा व्यक्तीचा तपशील.**

| | | | |
|---|---|---|---|
| **व्यक्तीचे/संस्थेचे नांव** | | | |
| **संस्थेशी संबंध** | | | |
| **ठिकाण** | | **गांव** | |
| **तालुका** | | **पिन** | |
| **जिल्हा** | | **फोन नं. /मो.नं** | |
| **आधार क्रमांक** | | **खाते असलेल्या बॅन्केचे नाव** | |
| **बॅन्क खाते क्रमांक** | | **बॅन्केचा IFSC कोड** | |

**४. अर्जदाराचा/संस्थेचा प्रवर्ग** (लागु असलेल्या ठिकाणी √ खूण करावी.)

**सर्वसाधारण प्रवर्ग / अनुसुचित जाती प्रवर्ग /अनुसुचित जमाती प्रवर्ग / महिला शेतकरी /अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी**

५. अर्जदाराने/संस्थेने धारण केलेल्या शेतजमिनीचा ७/१२ व ८-अ प्रमाणे तपशीलः

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |

६. अनुदानावर खरेदी करावयाच्या औजार/ उपकरणाचा तपशीलः

| अ. क्र. | खरेदी करावयाच्या औजार/ यंत्राचे नाव व तपशील | मॉडेल | उत्पादकाचे /कंपनीचे नांव | औजार/ यंत्राची किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| | **एकूण किंमत** | | | |

**७. खरेदी करावयाचे औजार/ यंत्र ट्रॅक्टर चलित असल्यास :**

अ. अर्जदाराकडे ट्रॅक्टर आहे /नाही.

ब. ट्रॅक्टरचे मॉडेल व कंपनीचे नाव : ................................................

**८. मी याद्वारे घोषित करतो/करते की, माझे शेतात मला उपरोक्त योजनेंतर्गत अनुदानावर उपरोक्त नमुद औजार / उपकरण मिळणे विषयी विनंती आहे. खालील नमुद अटींची मला जाणिव असुन त्या मला मान्य आहेत.**

१. औजाराची खरेदी किमतीची पुर्ण रक्कम भरुन खुल्या बाजारातुन औजाराची खरेदी करण्यास मी तयार आहे.

२. औजारे बॅन्क स्थापनेकरीता बॉन्ड पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

३. रु. २५ लाखावरील खरेदीच्या कृषि औजारे बॅंकेच्या अनुदानासाठी प्रस्ताव बॅन्क कर्ज प्रकरणाद्वारे सादर करणे आवश्यक असून अनुदानाची रक्कम बॅक एन्डेड सबसीडी स्वरूपात बॅंक खात्यात जमा केली जाईल.

४. ठरवून दिलेल्या माफक भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरविण्यास आमची तयारी आहे.

५. अनुदानाची रक्कम माझे आधार संलग्न बॅन्क खात्यामध्ये थेट जमा केली जाईल याची मला कल्पना आहे, त्याकरीता मी माझे बॅन्क खाते आधार क्रमांकाशी जोडलेले आहे.

६. मी औजार/उपकरण खुल्या बाजारातुन माझ्या पसंतीने खरेदी करणार असल्याने औजार/उपकरणाच्या गुणवत्तेची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे.

७. तसेच यापुर्वी मी उपरोक्त प्रस्तावासाठी किंवा त्याच्या काही भागासाठी कोणत्याही शासकीय/निमशासकीय यंत्रणेकडून अनुदान/आर्थिक मदत घेतलेली नाही.

८. मला औजारे खरेदीकरीता पुर्वसंमती मिळाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत औजारे/यंत्रांची खुल्या बाजारातुन खरेदी करणे आवश्यक आहे, अन्यथा मला प्रदान केलेली पुर्वसंमती रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

९. मला औजारे खरेदीकरीता पुर्वसंमती मिळाल्यानंतर औजारे/यंत्रांची खुल्या बाजारातुन खरेदी करताना स्वतःच्या बॅन्क खात्यातुन इलेक्ट्रॉनिक पध्दतीने (आर.टी.जी.एस. ईत्यादी)/धनादेश/धनाकर्षाद्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

१०. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी ज्या यंत्र/औजाराचे रीतसर परिक्षण (Testing) करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्‍चित केलेल्या प्रमाणकानुसार(standards)/तांत्रिक निकषांनुसार असल्याचे प्रमाणीत केले असेल, त्याच यंत्र/औजाराची खुल्या बाजारातुन खरेदी करावयाची असुन अनुदानाकरीता देयक सादर करताना त्याचे प्रमाणपत्र/तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

११. कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक अनुभव, प्रशिक्षीत, अनुभवी व पुरेसे मनुष्यबळ असणे, यंत्रसामुग्री व उपकरणे सुरक्षीत व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक जागा व शेडची व्यवस्था असणे बंधनकारक राहील. सर्व यंत्रसामुग्री व उपकरणे संबंधीतांनी माफक भाडे तत्वावर उपलब्ध करुन त्यांच्या सेवा शेतक-यांना वेळोवेळी पुरविणे बंधनकारक राहील.

१२. लाभधारकाने कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा शेतक-यांना पुरविल्याबाबत आवश्यक अभिलेख ठेवणे व त्याचा नियमीत अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत तपासणीच्या वेळी सर्व यंत्रसामुग्री/उपकरणे व अभिलेख सादर करणे बंधनकारक राहील.

१३. सदर कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणा-या यंत्रसामुग्री व उपकरणे यांची नियमीत देखभाल व दुरुस्ती करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारकांची राहील. संबंधीत सेवा-सुविधा केंद्रे व्यवस्थित चालविणे व वेळोवेळी त्यात सुधारणा करण्याची तयारी असणे आवश्यक राहील.

१४. सदर यंत्रसामुग्री व उपकरणे यांची परिवाहन विभागाकडे नोंदणी (रजिस्ट्रेशन), विमा, कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारकांची राहील.

**७. मी अर्जासोबत पुढील कागदपत्रांच्या <u>स्वयंसाक्षांकित</u> प्रती जोडत आहे.(लागु असलेल्या ठीकाणी √ खुण करावी.)**

१. स्वतःचे नावे शेत क्षेत्राचा अद्ययावत ७/१२ दाखला.

२. स्वतःचे नावे शेत क्षेत्राचा अद्ययावत ८ अ दाखला.

३. अनुसुचित जाती/ अनुसुचीत जमाती प्रवर्गातील असल्यास त्याबाबत प्राधीकृत अधिका-यांनी दिलेल्या वैध जात प्रमाणपत्राची प्रत.

४. आधार कार्ड/फोटो असलेल्या ओळखपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत.

५. खरेदी करावयाच्या यंत्र/औजारांचे अधिकृत विक्रेत्याचे दरपत्रक/कोटेशन.

६. बँक पासबुकाच्या पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत / रद्द केलेला धनादेश.

७. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

८. संस्थेशी संबंधीत व्यक्तीच्या बॅन्क खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधीकृत केले असल्यास प्राधीकृत केल्याचे पत्र.

**ठिकाणः** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**दिनांकः** **नांव-** ------------------------------

**टीप-** **१.** ज्या शेतक-यांनी अद्याप आधार नोदंणी केली नसेल, त्यांनी तात्काळ आपले नजीकचे आधार नोंदणी केंद्राशी संपर्क साधुन आधार नोंदणी करुन घ्यावी.

२. अनुदानाचा लाभ घेणेकरीता पुर्वसंमती प्रदान केल्यानंतर पुर्वसंमती पत्रात नमुद केलेल्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती देयकासोबत सादर करणे आवश्यक राहील.